**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शुक्रवार दिनांक १० एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **बालकांमधील असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रणासाठी नागपूर येथील एम्सच्या बालरोग विभागासोबत राज्य आरोग्य विभागाचा सामंजस्य करार.**
2. **भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन नगरपरिषदांनी दीर्घकालीन पाणी पुरवठा योजना साकारण्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांचे निर्देश.**
3. **अमरावती विभागाकडून साध्या बसच्या भाड्यात 10 टक्के वाढ.**
4. **अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या 'संघटन सृजन' अभियानास आजपासून नागपुरात सुरुवात.**

**आता सविस्तर बातम्या .......**

सामंजस्य करार

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेनं राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागानं, बालकांमधील असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रणासाठी, एम्स नागपूरच्या बालरोग विभागासोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराच्या माध्यमातून बालकांसाठी अधिक सुरक्षित आणि निरोगी वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने ठोस पाऊल उचललं जाणार आहे, असं प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. या करारांतर्गत राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये असंसर्गजन्य आजारांसाठी विभाग स्थापन करण्यात येणार आहेत. या उपक्रमातून टाईप-1 मधुमेह, जन्मजात हृदयरोग, दमा, स्थूलता, सिकलसेल, मानसिक आरोग्य आणि विकासात्मक विकार यांसारख्या आजारांचे प्रतिबंध, लवकर निदान आणि प्रभावी उपचार सुनिश्चित करण्यात येणार आहेत. हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे.

बावनकुळे

नागपूर इथं काल झालेल्या जिल्हा आढावा बैठकीत, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन नगरपरिषदांनी दीर्घकालीन पाणी पुरवठा योजना साकारण्याचं आवाहन केलं. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर, पाणी, शिक्षण, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन आणि सौर ऊर्जा ही विकासाची पंचसूत्री असल्याचं त्यांनी सांगितलं .मोठ्या पाणीपुरवठा योजनांसाठी आवश्यक तांत्रिक कौशल्य नसल्यानं, ही कामं महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्याचा सल्ला त्यांनी दिला. तसंच जलस्त्रोतांचे संरक्षण, नदी-नाल्यांची स्वच्छता आणि पाणी गळती रोखण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.भविष्यातील 25 वर्षांची लोकसंख्या लक्षात घेऊन गावांचा

पाणी विकास आराखडा तयार करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. पाणीटंचाईग्रस्त नगरपरिषदांनी 10 दिवसांत पाणी आरक्षण प्रस्ताव सादर करावेत, असंही त्यांनी सांगितलं.

यशवंत वर्मा

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी आज पदाचा राजीनामा दिला. अलाहाबाद न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम करत असताना वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात जळालेल्या नोटा आढळल्याप्रकरणी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात येत होता. राजीनाम्यासाठी वेगळं कारण न देता, आपण अतिशय शोकसंतापाने पदाचा राजीनामा देत असल्याचं, त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना उद्देशून लिहीलेल्या राजीनामापत्रात म्हटलं आहे.

जनगणना- २०२७

देशात गेल्या १ तारखेला जनगणना-२०२७ चा पहिला टप्पा सुरु झाला असून, आतापर्यंत ७२ लाख कुटुंबांनी स्वगणना पर्यायाचा अवलंब केला आहे. ही सुविधा देशात पहिल्यांदाच उपलब्ध करण्यात आली आहे. ११ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू असलेल्या पहिल्या टप्प्यासाठी ती १५ एप्रिलपर्यंत उपलब्ध असेल. जनगणना २०२७ च्या डिजिटल उपक्रमात अधिकाधिक नागरिक सहभागी होत आहेत, हेच यावरून दिसत आहे, असं रजिस्ट्रार जनरल म्हणाले.

कुणाल कामरा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी, कॉमेडियन कुणाल कामरा काल महाराष्ट्र विधानमंडळाच्या विशेषाधिकार समितीसमोर हजर झाले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या संदर्भात जे वक्तव्य केले, त्याबाबत कोणतीही खंत नसल्यानं याप्रकरणी माफी मागणार नसल्याची भूमिका कामरा यांनी मांडली. कुणाल कामरा यांना चौकशीवेळी २४ प्रश्न विचारल्याचं विशेषाधिकार समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी सांगितलं. याप्रकरणी कामरा यांनी बिनशर्त माफी मागितली तर वेगळ्या पद्धतीनं विचार करू ,असंही लाड यांनी सांगितलं.

‘अभिवादन काव्यगाज’

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त ,मुक्तिवाहिनी आणि रिपब्लिकन मुव्हमेंटतर्फे ‘अभिवादन काव्यगाज’ या काव्यसंध्येचं आयोजन करण्यात आल आहे. हा कार्यक्रम रविवार, 12 एप्रिल रोजी सायंकाळी साडेसहा वाजता संविधान चौक इथं होणार आहे. कार्यक्रमाचं हे २८ वं वर्ष असून ,अनेक नामवंत कवी यात सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ विचारवंत ताराचंद्र खांडेकर यांची प्रमुख उपस्थिती असेल.

होमिओपॅथी दिन

आज जागतिक होमिओपॅथी दिन साजरा होत आहे. होमिओपॅथी या उपचारपद्धतीचे जनक डॉ.सॅम्युएल हॅनेमान यांच्या जयंतीदिनी म्हणजे दरवर्षी 10 एप्रिलला हा दिवस साजरा केला जातो. 'शाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी' ही या वर्षीच्या जागतिक होमिओपॅथी दिनाची संकल्पना आहे.

हंगामी(एसटी)वाढ

उन्हाळी सुट्या आणि वाढती प्रवासी गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानं, साध्या बसच्या भाड्यात 10 टक्के हंगामी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ 15 एप्रिल पासून लागू होऊन 15 जून 2026 पर्यंत कायम राहणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने महामंडळाला गर्दीच्या काळात 30 टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची मुभा दिली आहे, त्याअंतर्गत अमरावती विभागाचे सक्षम प्राधिकारी यांनी ही 10 टक्के दरवाढ मंजूर केली आहे. या वाढीनंतर प्रति टप्पा भाडे १० रुपये ५ पैश्यांवरून 11 रुपये ५ पैसे असं राहील. सुधारित दरानुसार अमरावती-नागपूर 290 रुपये, अमरावती-धारणी 268 रुपये आणि अमरावती-अकोला 191 रुपये भाडं आकारलं जाणार आहे. ही वाढ केवळ साध्या बससाठी लागू असून इतर प्रगत सेवांचे दर पूर्ववत राहतील.

काँग्रेस सृजन संगठन

देशाच्या राजकीय पटावर नवचैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशान अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीन 'संघटन सृजन' हे अभियान सुरू करण्यात आलं आहे. त्याअंतर्गत आजपासून नागपूर जिल्ह्यात देखील पुढील आठ दिवस काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून पुनर्बांधणीचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. याबाबत आमदार विकास ठाकरे आणि काँग्रेसचे माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव यांनी नागपुरात पत्रकारांसोबत संवाद साधत या अभियानाची दिशा, उद्दिष्टे आणि दृष्टिकोन स्पष्ट केला. हे अभियानकेवळ एक प्रशासकीय उपक्रम नसून पक्षाच्या संघटनात्मक पुनर्रचनेचा आणि विचारधारेच्या पुनर्जागरणाचा व्यापक प्रयत्न असल्याचं त्यांनी सांगितलं. या अभियानाचा मुख्य हेतू जिल्हा काँग्रेस समित्यांना अधिक सक्षम, उत्तरदायी आणि जनसंवादी बनविण असा आहे असं यादव यावेळी म्हणाले.

चंद्रशेखर बावनकुळे

महायुतीचा धर्म उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी तोडला अशी टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील लक्षेश्वर संस्थान सभागृह, लाखपूरी इथं 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' कार्यक्रमानंतर ते माध्यमांशी बोलत होते. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस एकजुटीने काम करत असून राज्याच्या विकासाचं आमचं ध्येय असल्याचं त्यांनी सांगितलं.

पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्ह

बुलढाणा जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगारांसाठी 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्ह'चचं आयोजन, येत्या 13 एप्रिल रोजी आयटीआय, नांदुरा इथं करण्यात आलं आहे. या उपक्रमात चिरायु पॉवर, क्रेडिट ॲक्सीस ग्रामीण आणि क्वीज कॉर्पसारख्या कंपन्यांकडून विविध पदांसाठी भरती होणार आहे. दहावी, बारावी, आयटीआय आणि पदवीधर उमेदवारांना थेट मुलाखतीद्वारे निवड आणि प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून इच्छुकांनी सहभागी होण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

सायबर गुन्हे

राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलच्या आकडेवारीनुसार २०२५ या वर्षात देशभरात सायबर घोटाळ्याची २८ लाख प्रकरणं आणि सुमारे २२ हजार ९३१ कोटी रुपयांचा अपहार नोंदवला गेला. याची दखल घेऊन रिझर्व्ह बँकेनं ,डिजिटल घोटाळे किंवा फसवणूक टाळण्याच्या दृष्टीनं ४ नवीन उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. १० हजार रुपयांपेक्षा जास्तीचा डिजिटल व्यवहार पूर्ण करण्यासाठी ,एका तासाचा विलंब अवधी, वरिष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी सहाय्यकाकडून प्रमाणीकरण, ग्राहकांना डिजिटल पेमेंट करताना अधिक नियंत्रण सुविधा इत्यादी उपाययोजनांचा त्यात समावेश आहे. रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर हे प्रस्ताव उपलब्ध असून, त्यावर नागरिकांनी ८ मे पर्यंत आपल्या सूचना, प्रतिक्रिया मांडाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट मध्ये आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल्स चॅलेंर्जस बेंगळुरु बरोबर होणार आहे. या सामन्याला संध्याकाळी साडेसात वाजता गुवाहाटीमधे सुरुवात होईल.

हवामान

विदर्भात मागील २४ तासात 38.7 अंश सेल्सिअस तापमानासह अकोला जिल्हा सर्वात उष्ण ठरला. त्या पाठोपाठ अमरावती, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये तापमान 37°c ते 38 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

*****